**मुंबई विद्यापीठ** | **अंत्यत महत्त्वाचे**

क्र.वि.क.भा.स.शि/(२४)/ २३२/२००९ | हस्ते बटवडा/स्पिड पोस्टाने

**परिपत्रक:**

विषय: - मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क देण्याची योजने अंतर्गत आकारावयाचे शुल्क.

संदर्भ: १) विद्यापीठ परिपत्रक क. Concol/Fee/292 of 2008 दि. ७ जुलै, २००८

२) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क./भा.स.शि/(२४)/२९६/२००८ दि. ७ जुलै, २००८

सर्व प्राचार्य/संचालकअनुदानित/विना अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठाचे विविध विभाग प्रमुख/संचालक, सर्व उपकुलसचिव यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या संदर्भाधीन परिपत्रकनुसार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमासाठी नविन शुल्क रचना २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासुन पासून लागु केलेली आहे.

याबाबत, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी, विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या परिपत्रक क्र. Concol/Fee/292 of 2008 दिनांक ७ जुलै, २००८ मधिल ॲडमिशन प्रोसेसिंग फी, डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन फी, आय कार्ड शुल्क, ॲल्युमिनी असोसिएशन फी, डिझास्टर रीलिफ फंड, ग्रुप इंशुरंस फी, स्टुडंट वेलफेअर फंड व व्हाईस चान्सलर फंड, या शिर्षकाचे शुल्क आकारण्यात यावे. या व्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये.

डॉक्युमेंट व्हेरीफिकेशन फी महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या विद्यार्थ्यांव्यतिरीक्त इतर बोर्डाव्दारे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना लागु राहील.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासुन विद्यापीठाने नवीन शुल्क रचना बाबतचे परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. नवीन ठरविलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, इतर शुल्क, एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हीटीज, परीक्षा शुल्क, एन्रोलमेंट शुल्क, इंडस्ट्रीयल व्हीजीट, युटीलिटी फी, मॅगझीन फी, स्पोर्टस व कल्चरल ॲक्टिव्हीटी इ. चार्ज, प्रोजेक्ट फी, काम्प्युटर प्रॅक्टीकल, लॅब फी व डेव्हलपमेंट फी यांची परिपूर्ती समाज कल्याण विभागाकडून केली जाणार असल्याने वर नमूद केलेल्या शिर्षकाचे शुल्क मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन न स्विकारता प्रवेश देण्यात यावा.

स्थळ: - मुंबई
दिनांक: १८ जुन, २००९.
प्राचार्य.

प्राचार्य के. व्यंकटरमणी
कुलसचिव

क्र.वि.क./ /२००९ दिनांक १८ जुन, २००९.

प्रत.- प्राचार्य / संचालक कला, वाणिज्य व विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी, औषध-निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था. (अल्पसंख्यांक आणि बिगर अल्पसंख्यांक महाविद्यालये)

२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव यांना माहितीसाठी.

३. संचालक / विभाग प्रमुख विद्यापीठ विभाग आणि प्राचार्य सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय.

४. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ, फोर्ट, मुंबई.

५. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.

६. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

७. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, अ-१/२१, अनुपम नगर, मुरबाड रोड, कल्याण, जिल्हा - ठाणे.

८. सचिव, बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲकॅडेमिक स्टाफ असोसिएशन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.

प्राचार्य के. व्यंकटरमणी
कुलसचिव